साप्ताहिक
# आरोग्यधारा
शुभम् करोती कल्याणम् । आरोग्यम् धनसंपदा ।।

प्रति,
श्री.

Postal Regi. No. : ANR/004/2017-2019
Declaration No. : WS/40/2010

संपादक
श्री. गौतम आढाव
Mo . 982299 0787

सह.संपादक
सौ.नंदिनी आढाव जाधव
Mo . 9423033787

सा. आरोग्यधारा,सारस / रविश कॉलनी,कायनेटीक चौक,नगर पुणे रोड अहमदनगर ४१४००१
www.arogyadhara.com,adhavgautam@gmail.com

वर्ष १७ वे | अंक ३० वा | शुक्रवार ३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२४ | साप्ताहिक आरोग्यधारा | RNI-MAHMAR/2009/34851 | किंमत ३ रूपये

# सावधान! मंकीपॉक्स झपाट्याने पसरतोय






तुम्ही अनेक प्रकारच्या विषाणूंबद्दल ऐकले असेल, त्यापैकी एक करोना होता ज्याने संपूर्ण जगाला त्रास दिला होता. या विषाणूमुळे मोठ्या संख्येने लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. याच क्रमाने मंकीपॉक्सच्या विषाणूनेही जगात आपले पाय पसरवले आहेत. आतापर्यंत डझनहून अधिक देशांना याचा फटका बसला आहे आणि मंकीपॉक्सची अनेक प्रकरणे येथे नोंदवली गेली आहेत.अशा परिस्थितीत, आपण देखील या विषाणूपासून सुरक्षित राहणे आवश्यक आहे, ज्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्याच वेळी, आपल्याला त्याच्या लक्षणांबद्दल जागरूक असले पाहिजे कारण ते हलके घेतले जाऊ शकत नाहीत. जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केल्यानंतर जगात मांकीपॉक्सची भीती वाढली आहे. भारतही याबाबत सतर्क आहे. सर्वांना सावध राहण्याचा सल्ला दिला जात आहे. काही गोष्टी लक्षात ठेवल्यास हे टाळता येऊ शकते. चला तर मग जाणून घेऊया काय आहेत मंकीपॉक्सची लक्षणे.

केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी नुकतीच मंकीपॉक्सच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. अधिक खबरदारी घेण्यासाठी काही उपाययोजना कराव्यात, असा निर्णय बैठकीत



घेण्यात आला.जसे की सर्व विमानतळ, बंदरे आणि ग्राउंड क्रॉसिंगवर आरोग्य सुविधांना संवेदनशील करणे. चाचणी प्रयोगशाळा, कोणतीही प्रकरणे शोधण्यासाठी, वेगळे करण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी आरोग्य सुविधा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, हा विषाणू सध्या मध्य आफ्रिकेत आणि आसपास असल्याने, भारतातील सीमावर्ती भागात पाळत ठेवणे आणि तपासणी सुरू करणे आवश्यक आहे. जर कोणी बाधित देशांतून येत असेल तर त्याची चाचणी करावी, जेणेकरून हा संसर्ग भारतात पोहोचू नये. स्वच्छता आणि सावधगिरी बाळगून हा आजार टाळता येतो.

**मंकीपॉक्सपासून आपण स्वत:चे संरक्षण कसे करू शकतो?**

जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीच्या एखाद्याला मंकीपॉक्स झाला असेल, तर सर्वप्रथम तुम्ही **ज्याला त्याचा त्रास होत असेल त्यापासून दूर राहावे.**

संक्रमित व्यक्तीला वेगळे करा

स्वच्छतेची विशेष काळजी घ्या

आणि वारंवार हात धुवा

शारीरिक संबंध टाळावेत.

**या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**



जर तुम्हाला जास्त ताप येत असेल तर ते मंकीपॉक्सचे लक्षण असू शकते. याशिवाय सकायू दुखणे, पाठदुखी, सूज येणे, लाल पुरळ येणे आणि या पुरळांवर खाज येणे, तीव्र डोकेदुखी लक्षात ठेवा की जर तुम्हाला वरीलपैकी कोणतीही लक्षणे दिसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमच्या एका छोट्याशा चुकीमुळे हा व्हायरस तुम्हाला पकडू शकतो. म्हणून, लक्षणे दिसू लागताच आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधा.















# नेप्ती नाका, कल्याण रोड, सीना नदी वरील रस्ता कॉँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ संपन्न

नगर कल्याण रोड परिसर हा नगर शहराचे मोठे उपनगर निर्माण झाले असून या ठिकाणी मोठी लोक वस्ती निर्माण झाली आहे. येथून राष्ट्रीय महामार्ग जात असून सीना नदीवरील पुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे. या भागातील रस्ता अत्यंत खराब झाला असून तात्पुरत्या स्वरूपात रस्ता कॉँक्रिटी करण्याचे काम हाती घेतले आहे.



गणपतीचे दिवस जवळ येत असून कल्याण रोड शिवाजीनगर परिसरामध्ये गणपतीचे मोठ-मोठे कारखाने या ठिकाणी असून राज्यभरातील नागरिक, मित्र मंडळ गणपती खरेदीसाठी येत असतात तसेच नेप्ती नाका बारावेमध्ये शहरातील मानाच्या गणपती पासून ते घरगुती गणपती पर्यतचे विसर्जनाचे काम मोठे भक्ती भावाने नागरिक करत असतात. यासाठी तातडीने रस्त्याचे काम मार्गी लागणे गरजेचे होते म्हणून प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली आहे. मोठ-मोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाली होती आता लवकरच सीना नदीवरील पुलाचे व रस्त्याचे काम मार्गी लागणार असल्याचे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.यावेळी आ.संग्राम जगताप, प्रा.अरविंद शिंदे, माजी सभापती संजय गाडे, वैभव वाघ, विकी वाघ, गणेश दातरंगे, इं.विजय कुमार पाधीर, चंद्रकांत भिंगारदिवे, हरिभाऊ येलदंडे, शरद दातरंगे, सनी दातरंगे, विनायक वाहक, स्वामी येलदंडी, राजू कोंडके, विनीत गाडे, युवराज गुंजाळ आदि उपस्थित होते.कल्याण रोड सीना नदीवरील पुलाचे काम मार्गी लागावे यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला असून सुमारे २७ कोटी रुपयांचे निधी उपलब्ध झाला आहे प्रत्यक्षात पुलाच्या कामाला देखील सुरुवात झाली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कल्याण रोड परिसराला सुशोभी करणाचे रूप प्राप्त होईल असे मत आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केले

# कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगासाठी चौथ्या दिवशीही उपोषण सुरू

अहमदनगर मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू होण्यासाठी चौथ्या दिवशीही उपोषण सुरूउद्या साफसफाई कऱ्मचारी काम बंद आंदोलन करून पाठिंबा देणारराज्य सरकारने लवकर निर्णय न घेतल्यास रात्री स्ट्रीट लाईट बंद ठेवणार नगरकरांनी महापालिका कर्मचारी यांच्या उपोषणाला पाठिंबा द्यावा कर्मचाऱ्यांची मागणीनगर : अहमदनगर मनपा कर्मचारी अधिकारी नगरकरांना जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व सुविधा उपलब्ध करून देत असतात संकट काळामध्ये सवात आधी धावून येणारे कर्मचारी म्हणजे महापालिकेचे कर्मचारी होय.. तरीदेखील अहमदनगर मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न गेल्या आठ वर्षापासून प्रलंबित आहे, राज्य सरकार या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप मनपा कर्मचाऱ्यां नी यावेळी केला, चौथ्या दिवशी साफसफाई कर्मचारी आपले सफाईचे काम उरकून उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आले होते, यावेळी त्यांनी सांगितले की उद्या पहाटेपासून शहरातील स्वच्छता बंद ठेवणार असल्याचा इशारा यावेळी दिला, जर सरकारने लवकर निऱ्णय न घेतल्यास शहरातील रात्रीचे पथदिवे देखील बंद ठेवले जाईल महापालिका कऱ्मचारी व नगरकर यांचे कामाच्या




माध्यमातून ऋणानुबंध निऱ्माण झाले असून नगरकरांनी देखील कर्मचाऱ्यांच्या सातवा वेतन आयोग लागू व्हावा यासाठी पाठिंबा द्यावा अशी मागणी मनपा कर्मचाऱ्यांनी यावेळी केली. अहमदनगर मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू होण्यासाठी चौथ्या दिवशीही उपोषण सुरू असून यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, माजी नगरसेवक अशोक दहिफळे, आर जी सातपुते, अस्थापना विभाग प्रमुख मेहर लहारे, कामगार युनियनचे सचिव आनंद वायकर, अनंत लोखंडे आदिसह कऱ्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते मनपा कऱ्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न माऱ्गी लागावा यासाठी उपोषणकऱ्ते बाबासाहेब मुदगल बाबासाहेब राशिनकर आणि जितेंद्र सारसर उपोषणाला बसले असून चौथ्या दिवशी सांगितले की जर सरकारने लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास अन्नत्यागाबरोबरच पाण्याचा देखील त्याग केला जाईल असे सांगितले मनपा कर्मचारी आपले काम बंद ठेवून मोठ्या संख्येने पाठिंबा देण्यासाठी येत आहेत

# पुतळा बनवणाऱ्या आपटेला आम्ही आपटणार, राणेंचा सांगलीतून इशारा

सिंधुदुर्ग : मालवण येथील राजकोट किल्ल्यावर ९ महिन्यांपूर्वीच उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. मात्र, राज्यात गेल्या दोन दिवसांपासून या मुद्द्यावरुन राजकीय नेतेमंडळी आमने-सामने आली आहे. राजकोट किल्ल्यावर बुधवारी महाविकास आघाडीचे नेतेमंडळी आणि राणे पिता पुत्र एकत्र आल्यामुळे चांगलाच राडा झाल्याचं पाहायला मिळालं.त्यात, शिवसेना उबाठा पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे आणि राणे पुत्र समोरासमोर आल्यामुळे तणाव वाढला होता.त्यावेळी, तेथे कार्यकर्त्यांमध्ये हाणा मारीच्याही घटना घडल्या आहेत. याप्रकरणावरुन आता शिवसेना उबाठा



पक्ष आक्रमक झाला असून शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पुण्यात आंदोलन सुरू केलं आहे. यावेळी, सुषमा अंधारे यांनी नितेश राणे आणि पुतळा बनवणाऱ्या आपटेचा फोटो दाखवला. आता, नितेश राणे यांनी पलटवार करत, आपटेला आम्ही आपटणार असल्याचं म्हटलं आहे. सिंधुदुर्गमधील किल्ल्यावर उभारलेला शिवाजी महाराजांचा पुतळा बनविणाऱ्या आपटे नावाच्या व्यक्तीला आम्ही सोडणार नाही, आम्ही त्याला नक्की आपटणार,असे म्हणत नितेश राणेंनी पुतळा बनवणाऱ्या ठेकेदार आपटेला इशारा दिल आहे. विशाळ गडावर हिरव्या चादरी टाकत आहेत, महाराजांच्या गड किल्ल्यांची काय अवस्था करून ठेवली आहे. सिंधुदुर्गकडे जाणाऱ्या नेत्यांना विशाळ गडवरील जिहाद्यांचे आतीक्रमने दिसली नाहीत का, असा सवालही नितेश रणेंनी विचारला आहे. नितेश राणे यांची आज सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे रॅली काढण्यात आली आहे, त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना इस्लामपूरचं नाव बदलणार असल्याचं म्हटलं. राजकोट किल्ल्या वरील छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा माणूस आहे. जयदीप आपटे हा अनुभव नसलेला मूर्तीकार होता. तरीही त्याला शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम कसे देण्यात आले? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत, त्यावरुन आज सुषमा अंधारे यांनी सवाल उपस्थित केले आहेत. यावेळी बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, समितीने पुतळा पाहिला होता का, समितीने पुतळ्याला हिरवा कंदील दाखवला होता का? समितीने जर हिरवा कंदील दिला होता तर कोण ते विद्वान होते ज्याला पुतळ्याचं शरीर सौष्ठव कळलं नाही आणि जर त्यांनी तो हिरवा कंदील दिला नसेल, जर परवानगी दिली नसेल तर तो पुतळा उभा का केला असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. यावेळी, त्यांनी नितेश राणे आणि जयदीप आपटे यांचे एकत्रित फोटोही दाखवले आहेत. त्यानंतर, नितेश राणेंनी पलटवर करताना आपटेला आम्ही आपटणार असल्याचं त्यांनी म्हटलं






# चेहरे .....



गेले काही दिवस त्या नियमितपणे मॉर्निंग वॉकला जात होत्या.रस्त्यात अंतरा अंतरावर ठराविक चेहरे रोज दिसत. सोसायटीतून बाहेर पडल्या बरोबर समोरून येणारी एक टीनएजर मुलगी दिसे. सडसडीत, फॅशनेबल कपडे वापरणारी, आकर्षक. तिच्या कुरळ्या केसांच्या अस्ताव्यस्त बटा तिच्या सौंदर्यात भर घालत. आताशा काकू दिसल्या की ती मिस्कीलपणे डोळे मिचकवून हसे.ही अनोळखी गोड पोरगी आवडू लागली काकूंना. जरा पुढे गेलं की भावल्यां सारख्या दिसणाऱ्या दोन चिमुरड्या जुळ्या मुली आणि त्यांची आई स्कूलबसची वाट पहात त्यांच्या सोसायटीच्या गेटपाशी उभ्या असाय च्या. तिथून पुढे सरकलं की पंचविशीचा एक उंचनिंच तरुण लांब ढांगा टाकत समोरून येत असे. एक मध्यमवयीन बाई काकूंना मागे टाकून जवळपास धावतच जायची. रोजची लोकल चुकू नये म्हणून असणार ! एकदा न राहवून काकू तिला थांबवत म्हणाल्या,‘जरा सावकाश. धडपडून पडाल बिडाल एखाद दिवशी. ‘रस्त्यातली भटकी कुत्री, झाडं सगळंच माहितीचं झालं होतं. एकदा नाक्यावरच्या भल्या थोरल्या वृक्षाकडे काकू मान वर करून बघत होत्या. त्या कशाला तरी अडखळल्या आणि....... खालीच पडल्या एकदम. डोक्यात कळ गेली आणि त्यांच्या डोळ्यासमोर अंधेरी आली. त्यांनी डोळे उघडले तेव्हा भलाथोरला घोळका त्यांच्याभवती जमला होता. त्यात नेहमी दिसणारे सगळेच होते.‘काकू,मला’धडपड शील’ म्हणताना आज तुम्हीच धडपडून पडलात.आता बरं वाटतंय ना?‘ती लोकलवाली बाई म्हणाली. काकूंच्या काळजीने आज लोकल चुकण्याची पवा न करता ती तिथे थांबली होती. जुळ्या भावल्यांची सोसायटी अगदीच जवळ होती. कुणीतरी काकूंना दंडाला धरून उठवलं आणि सोसायटीत बाकड्यावर नेऊन बसवलं.सगळा घोळका मागोमाग आला.‘ काकू, पाणी हवंय का ?‘ त्या टीनएजर गोड पोरीने पाण्याची बाटली काकूंसमोर धरली. जुळ्या भावल्यांची आई त्यांच्या शेजारी बसली. तिने त्यांचा हात हातात घेतला. केवढी ऊब होती तिच्या स्पर्शात !‘तुम्ही इथे जवळच रहाता ना? चला. मी तुम्हाला घरी सोडायला येते.“ नको हो.आता मी जाईन.“मी येते म्हणते तर!‘ती खरोखरच काकूंना घरी सोडायला आली.‘एवढ्या मोठ्ठ्या तीन बेडरूमच्या फ्लॅटमध्ये आम्ही दोघेच. दोन्ही मुलं अमेरिकेत. हे रिटायर झाले हल्लीच. हा फ्लॅट पूर्वीच घेऊन ठेवलाय. हे रिटायर झाल्यानंतर आता आलो इथे रहायला. पण ह्यांचं विश्व वेगळं. माझं वेगळं.दोघांचा स्वैपाक व्हायला कितीसा वेळ लागतो ! त्यामुळे वेळ खायला उठतो मला.‘काकूंनी सांगितलं.‘ओके.“आज भाज्यांचं कटलेट केलंय नाश्त्याला. खाऊन बघा कसं झालंय.“काकू, मला अहो जाहो करू नका. माझं नाव गौरी. कटलेट झक्कास झालंय. कसं केलं ?‘ काकूंचा चेहरा खुलला.‘वाटीभर मटार घेतले. बारीक चिरलेली फरसबी. गाजर, बीट किसून...‘काकू रेसिपी सांगू लागल्या. आता रोज दिसणारे चेहरे अनोळखी राहिले नाहीत. काकू रस्त्यात थांबून सगळ्यांशी चार शब्द बोलू लागल्या. गौरी तिच्या मुलींना घेऊन वरचेवर काकूंकडे येऊ लागली. एकदा काकूंनी मुलींना पम्पकीन मध्ये बसून ’चल रे भोपळ्या टुणुक टुणुक’ म्हणत मॅन इटर टायगरला चकवून गेलेल्या स्मार्ट आजीची गोष्ट सांगितली. मुली बेहद्द खूश झाल्या. त्यांना गोष्ट आणि तालासुरात म्हटलेलं ’चल रे भोपळ्या टुणुक टुणुक’फार म्हणजे फारच आवडलं ! त्यांनी काकूंना ती एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगायला लावली. भोपळा, नरभक्षक वाघ हे मराठी शब्दसुद्धा मुलींना माहीत झाले.‘ काकू, तुम्ही संस्कार वर्ग घ्या ना !“बापरे ! ते काय असतं ?“छोट्या मुलांना गोष्टी सांगायच्या.गाणी, श्लोकबिक शिकवायचे. असं सगळं. आणि पैसे घ्यायचे त्याचे.“पैसे बिसे नाही घेणार. पण तू म्हणते आहेस ते जमेल मला. माझी मुलं लहान होती तेव्हा मी रोज संध्याकाळी परवचा म्हणून घेत असे त्यांच्याकडून. आता काय ! सगळंच बदललंय. मुलं आणि आई वडील .सर्वचजण मोबाईल मध्ये घुसून बसलेले असतात घरोघरी. ‘काकूंचा संस्कार वर्ग सुरू झाला. खूप बोलबाला झाला त्याचा. चिमुरडी मुलं या छानछान गोष्टी सांगणाऱ्या, उड्या मारून, नाचून गाणी म्हणणाऱ्या, रोज नवीन नवीन खाऊ करून देणाऱ्या काकूंवर जाम खूष झाली. गौरीने काकूंना स्मार्टफोन व्यवस्थित वापरायला शिकवला. फेसबुकवर अकाउंट उघडून दिला.काकूंना अलीबाबाची गुहाच उघडल्या सारखं वाटलं ! पटलं, की सोशल मिडियाला आभासी जग वगैरे म्हणत असले तरी माहिती भरपूर मिळते तिथे. छान करमणूकसुद्धा होते. वेळ बरा जातो. खाद्यपदार्थ, स्वयंपाक याच्या शी संबंधित ग्रुप्स जॉईन केले काकूंनी. त्यांच्या पारंपरिक रेसिपीजवर भरभरून लाईक्स, कमेंट्स येऊ लागले.ह्यापूर्वी काकूंना आयुष्यात रितेपण आल्या सारखं वाटत होतं. रोज बदलणाऱ्या या आधुनिक जगात आपण निरुपयोगी कुचकामी आहोत, अडगळीत पडल्या सारख्या झालोय अशी विचित्र नैराश्याची भावना मूळ धरू लागली होती. मात्र आता आपलाही उपयोग आहे, अनेक गोष्टी आपल्याला उत्तम जमतात, आपणही इतरांना ज्ञान, माहिती देऊ शकतो हा ’साक्षात्कार’ झाला आणि त्यांचं जगच बदललं !निरुत्साह, निराशा, मरगळ पार कुठल्या कुठे पळून गेली ! तब्येतीच्या तक्रारी आपोआप दूर झाल्या. त्यांचं त्यांनाच जाणवलं की त्यांची दुखणी शारीरिक कमी आणि मानसिक जास्त होती.काकूंनी वीकएण्डला छोटीशी पार्टी द्यायचं ठरवलं. त्या रोजच्या सारख्या मॉर्निंग वॉकला गेल्या तेव्हा आता ओळखीच्या झालेल्या सर्व चेहऱ्यांना त्यांनी शनिवारच्या पार्टीचं आमंत्रण दिलं. एका पायावर तयार झाले सगळे !‘गौरी खोदून खोदून विचारू लागली. ‘कशाबद्दल पार्टी ? काय कारण ? सांगा ना काकू.“आधी अनोळखी असलेल्या चेहऱ्यांमुळे मला माझा खरा चेहरा सापडला. म्हणून. “म्हणजे ?‘ गौरी गोंधळून गेली.‘अगं, म्हणजे तुम्ही सगळ्यांनी मला माणसात आणलंत. ही म्हातारी अजून कामाची आहे याची जाणीव करून दिलीत. मग कृतज्ञता व्यक्त करायला नको का ? मला माझी स्वतःची ओळख नव्याने पटली. माझा चेहरा मला मिळाला तुमच्यामुळे. म्हणून आहे ही पार्टी.‘गौरी आश्चर्याने बघतच राहिली काकूंकडे. त्यांचा चेहरा आत्मविश्वास पूर्ण, तजेलदार दिसत होता. – रश्मी साठे.




# युनियन बँकेत नोकर भरती सुरू

## आजपासून अर्ज सुरू, पदवीधरांनी करावा त्वरित अर्ज




पदवीचे शिक्षण पूर्ण केल्या नंतर सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारां साठी एक आनंदाची बातमी आहे. युनियन बँक ऑफ इंडिया (UBI) ने अप्रेंटिस पदांच्या भरतीसाठी अधि सूचना जारी केली आहे. या पदांसाठी आज, २८ ऑगस्ट पासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. उमेदवार १७ सप्टेंबर २०२४ पर्यंत बँकेच्या अधिकृत वेबसाइट union bank of india.co.i ला भेट देऊन अर्ज करू शकतात. बँकेने एकूण ५०० शिकाऊ पदांसाठी भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. कोणत्याही राज्यातील उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. उमेदवारांना हे लक्षात ठेवावे लागेल की ते केवळ त्यांच्या गृहराज्यात नियुक्तीसाठी अर्ज करू शकतात.अर्ज करणाऱ्या उमेदवारा कडे कोणत्याही मान्यता प्राप्त विद्या पीठातून कोणत्याही शाखेतील पदवीधर असणे आवश्यक आहे. उमेदवाराचे वय २० ते २८ वर्षे दरम्यान असावे.१ ऑगस्ट २०२४ पासून वयाची गणना केली जाईल. कमाल वयोमर्यादेत ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना ३ वर्षे, एससी आणि एसटी साठी ५ वर्षे आणि अपंग प्रवर्गातील उमेदवारांना १० वर्षे सूट देण्यात आली आहे अर्जदारांची निवड लेखी परीक्षेद्वारे केली जाईल. परीक्षेत १०० गुणांचे एकूण १०० प्रश्न विचारले जातील. परीक्षा मोडमध्ये असेल आणि वेळ १२० मिनिटे असेल. परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीसाठी बोलावले जाईल. अंतिम निवड गुणवत्तेद्वारे केली जाईल. अधिक माहितीसाठी, तुम्ही बँकेने जारी केलेली भरती जाहिरात पाहू शकता.




मा. गौतम आढाव
संपादक, साप्ता. आरोग्यधारा
अध्यक्ष, अ.नगर हेल्थकेअर असो.
अध्यक्ष, महाशक्ती ॲम्ब्युलन्स संघटना
मो. ९८२२९९०७८७ / ९४२३०३३७८७

# आरोग्यधारा

शुभम् करोती कल्याणम् । आरोग्यम् धनसंपदा ।।

follow us
9822990787
arogyadhara
arogyadhara
gautamadhav
9822990787
www.arogyadhara.info






# जेजे रुग्णालयाची मोठी झेप!

## रुग्णांच्या सुरक्षेसाठी स्थापन केले अँटीमायक्रोबायोल इमर्जन्सी कक्ष

ुंबई : मुंबईसह राज्याच्या काना कोपऱ्यातील रूग्णांच्या आरोग्या ची काळजी घेणारे जे.जे. रुग्णालय सर्व ॲक्रेलिक पेंटचा यामध्ये वापर करण्यात आला आहे. इस्रायलच्या आरोग्यसेवा प्रणालीमध्ये यश



रुग्णांना चांगल्या सुविधा मिळण्या साठी नेहमीच कार्यरत असते. सातत्याने जेजे रुग्णालया बाबत नवीन अपडेट्स समोर येत असताना एक आनंदाची मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईतील सर्वात मोठे सरकारी रुग्णालय असलेल्या जे. जे. रुग्णालया मध्ये रुग्णांची सुरक्षा आणि संसर्ग नियंत्रणासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा सुरु करण्यात आली आहे.या सुविधेमध्ये प्रगत प्रतिजैविक ॲक्रेलिक पेंटचा वापर करण्यात आला आहे.काल या अत्याधुनिक अँटी मायक्रोबायोल इमर्जन्सी कक्षाचे आज उद्घाटन करण्यात आले असून या तंत्रज्ञानामुळे काही तासांत ९९.९९ टक्के विषाणूंवर नियंत्रण मिळवणे सोपे होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, इस्रायल येथील डीप-टेक कंपनी नॅनोसोनोने निर्लाटच्या सहकार्याने विकसित केली आहे. प्रगत प्रतिजैविक मिळालेले हे तंत्रज्ञान मुंबईतील इस्रायलचे महावाणिज्य दूतावास, सेंट गव्हर्न्मेंट मेडिकल कॉलेज आणि महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नांतून भारतात आणले गेले. यात समाविष्ट केलेले क्आएक्टीव्ह, हे तंत्रज्ञान पेंट जोपर्यंत भिंतींवर राहतो तोपर्यंत हानिकारक सूक्ष्मजीवांपासून संरक्षण मिळणार आहे. तसेच हे पेंट आणि तंत्रज्ञान संक्रमण नियंत्रणासह पर्यावरणास अनुकूल तसेच सुरक्षित आहे.वैद्यकीय सुविधांमध्ये बदल घडवून आणणारी झेपइस्रायल आणि भारतामध्ये आरोग्य क्षेत्रातील देवाण-घेवाणसाठी होत असलेले सहकार्य महत्त्वपूर्ण आहे. वैद्यकीय क्षेत्रातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. दोन्ही राष्ट्रांमधील सहयोग यामुळे आणखी वृधीगत होईल. वैद्यकीय सुविधामध्ये बदल घडवून आणणारी ही झेप आहे, असे इस्रायलचे मुंबईतील कॉन्सुल जनरल कोबी शोशानी यांनी म्हटले.

# औषधे विकणारे डॉक्टर आता रडारवर

अहमदनगर (प्रतिनिधी) ओपीडीमध्ये डॉक्टरांनी रुग्णाची तपासणी करून औषधे लिहून देणे सर्वमान्य आहे. औषध प्रचारासाठी सॅम्पल मिळालेले औषध रुग्णाला मोफत देण्यासही डॉक्टरांना मुभा आहे. पण काहींनी आपल्या ओपीडीतच औषधे विकण्याचा धंदा सुरू केल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्र स्टेट केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनने तशी तक्रार केल्याने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) औषधे विकणाऱ्या डॉक्टरांना कारवाईच्या रडारवर घेतले आहे. राज्यात अशी तपासणी मोहीम सुरू झाली आहे. ऑगस्टपर्यंत अशी तपासणी करण्याचे आदेश एफडीए प्रशासनाकडून निरीक्षकांना देण्यात आले असून, प्रत्येक औषध निरीक्षकाला किमान डॉक्टरांची तपासणी करण्याच्या सूचना आहेत. दरम्यान, अशा तपासणीला डॉक्टरांचा आक्षेप आहे. मेडिकल स्टोअरमध्ये औषधाचे बिल न देता होणारा काउंटर सेल आणि ॲमेझॉनपासून अन्य बड्या कंपन्यांद्वारे ऑनलाईन होणारी औषधे विक्री याला चाप कधी बसणार, असा



सवाल उपस्थित होत आहे.औषधे व सौंदर्य प्रसाधने नियम च्या अनुसूची के चे सर्रास उल्लंघन होत असल्याचे तक्रारी आहेत.शेड्युल केअंतर्गत येणारी अनेक औषधे स्थानिक डॉक्टरांकडून त्यांच्या कडे येणाऱ्या व बाहेरून येणाऱ्या रुग्णांना विकली जात असल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँडड्रगिस्ट असोसिएशनने एफडीएकडे केली होती. डॉक्टरांनी मेडिकल दुकानदारांप्रमाणेच औषधांचा साठा करून नियमांचे उल्लंघन केले आहे. या औषध खरेदीच्या नोंदी ठेवल्या जात नाहीत. बिलाविना औषधांची विक्री होत आहे. मोफत मिळणाऱ्या औषधांच्या नमुन्यांचीही विक्री केली जात आहे, अशा तक्रारी आल्याने राज्य अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) स्थानिक फिजिशियनकडे असलेल्या औषधांच्या साठ्यांची तपासणी करण्यात येणार आहे. या औषधांचा वापर दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांऐवजी इतर रुग्णांकरिता होत आहे का, काही डॉक्टर फार्मासिस्टप्रमाणे औषधे देत आहे का, हे तपासून दोषी आढळल्यास कडक कारवाई करण्यात येईल

# अहमदनगर दौंड रस्त्यावर बस उलटून दोघांचा मृत्यू

अहमदनगर-दुचाकीला धडक दिल्यानंतर खासगी बस उलटून झालेल्या अपघातात दोन जण जागीच ठार झाले तर इतर चार ते पाच प्रवासी किरकोळ स्वरूपात जखमी झाले. अपघात नगर-दौंड रस्त्यावर नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद फाट्याजवळ काल, बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास झालाअपघातातील मृतामध्ये बाबुर्डी घुमट गावातील भाऊसाहेब दगडू येवले व बस चालक या दोघांचा समावेश असल्याचे समजले. बस चालकाचे नाव रात्री उशिरापयंनत समजू शकले नाही. बस (जीजे ०५ बीयु ७७१७) दौंडहून नगरकडे येत होती व ती पुढे अहमदाबादला जाणार होती. बसमध्ये एकूण १० ते १२ प्रवासी होते. बाबुर्डी बेंद फाट्याजवळ बसची प्रथम



दुचाकीला (एमएच १६ बीडी ३४५८) धडक बसली.त्यानंतर बस रस्त्याच्या खाली जाऊन उलटली गेली. माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली व १०८ क्रमांकाची रूग्णवाहिकाही तेथे आली. त्यामधून जखमी व मृतांना जिल्हा रूग्णालयात दाखल केले. माहिती मिळतच नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी घटनास्थळी धाव घेतली व वाहतूक सुरळीत केली.


फाटके पाटील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cures..
info@phatakepatilhospital.com



आपल्या संपूर्ण परिवाराची आपुलकीने काळजी घेणारे
आरोग्यमित्र
सर्व प्रकारच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ.श्री.सतिश शिवाजीराव फाटके
एम.डी. (मेडी) हृदयरोगतज्ञ
डॉ.सौ.अंजली फाटके
एम.डी. (पॅथ) कन्सल्टींग पॅथॉलॉजीस्ट
उपलब्ध सुविधा
▸ सुसज्ज ऑपरेशन थिएटर ▸ एक्स-रे ▸ सोनोग्राफी ▸ पूर्ण वेळ फिजिशियन ▸ पूर्ण वेळ इंटेसिव्हिस्ट ▸ कार्डियाक व ट्रॉमा इमर्जन्सी ▸ पेसमेकर (टेंपररी)
▸ प्रदिर्घ आय.सी.यु. अनुभवी डॉक्टर्स पूर्ण वेळ उपलब्ध ▸ सर्व आय.सी.यु. प्रोजियर्स (इंटुबेशन, सेंट्रल लाईन, पेस मेकिंग इ.) ▸ तज्ज्ञ डॉक्टरांच्या भेटी
▸ व्हेंटिलेटर (इन्वहेसिव्ह व नॉन इन्वहेसिव्ह) ▸ मल्टीपॅरा मॉनिटर्स व सेंट्रल मॉनिटरींग ▸ सिरींज पंप ▸ डिफीब्रीलेटर
▸ सेंट्रल ऑक्सिजन ▸ प्रशिक्षित व विनम्र स्टाफ ▸ रक्तलघवी तपासणी व पॅथलॉजी लॅब ▸ कॅशलेस सुविधा
▸ सर्व प्रकारचे आजार, हृदयविकार, पक्षाघात, मेंदुचे विकार, सर्पदंश, विषबाधा फिटचा आजार, मधुमेह, रक्तदाब, काविळ, पोटाचे विकार यांवर उपचार केले जातील.
स्वस्तिक चौक, स्टेशन रोड, अहमदनगर - ४१४ ००१., मो. २४५२१४०



डौले हॉस्पिटल
ॲक्सिडेंट ॲण्ड मॅटर्निटी होम
मातृत्व टेस्ट ट्युब बेबी सेंटर
डॉ. पी. एम. डौले
एम. एस (ऑर्थो)
अस्थिरोग तज्ञ
डॉ. सौ. ज्योत्स्ना पी. डौले
एम. बी. बी. एस. डी. जी. ओ.
स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ



हे साप्ताहिक मालक,प्रकाशन,संपादक,श्री गौतम दतु आढाव यांनी मुद्रक श्री.अमरजीत चंद्रकांत दिंकोडा यांच्या,उमा ग्राफिक्स,घर नं.४६८३,दसरे वाडावळ,झारेकर गल्ली. अहमदनर -४१४००१ येथे छापून -३०/ए/२७,सारस/रविश कॉलनी,कायनेटिक चौक.पुणे रोड,अहमदनगर ४१४००१(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले (अहमदनगर न्यायकक्षेत्र)